# दैनंदिन गुन्हे अहवाल                    दिनांक १७/०५/२०२०

## १.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.न. ३९३/२०२० कलम ३५४,३५४ (ड) भादवी |
| फिर्यादी | एक महिला |
| घटनास्थळ | पाठ्यपुस्तक जवळील चौक अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १७/०५/२०२० चे ०७.४५ वा. |
| दाखल ता. वेळ | दि. १७/०५/२०२० चे ९.५७ वा |
| आरोपी | अनओळखी ईसम |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | यातील हकीकत अशा प्रकारे आहे की, ,नमुद घटना ता.ठिकाणी व वेळी यातील फिर्यादी ही मॉर्निंग वॉक करित असतांना एक अदाजे ५० वर्षाचा अनओळखी ईसमाने फिर्यादी चे मागे मागे जात फि.चे मनात लज्जा उत्पन्न होईल असे बोलून निघुन गेला. तसेच फिर्यादी याने तिच्या दिरास पाठ्यपुस्तक चौकात बोलावुन घेतले व घरी जात असतांना तोच ईसम फिर्यादीला परत दिसला असता फिर्यादीने दिरास सांगुन त्या ईसमावर पकडण्याचा प्रयत्न केला असता तो ईसम सायकल सोडुन पळुन गेला त्यानंतर तेथे एक २० वर्षीय युवक मोटार सायकल घेवुन आला व मेरे चाचा की सायकल हे असे म्हणुन त्याला विचारले असता टाळटाळ केली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | पोउपनि. सत्यवान भुयारकर पोस्टे. गाडगेनगर अमरावती |

## २.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.न. ३९४/२०२० कलम ४६१, ३८० भादवी |
| फिर्यादी | सुनिल श्यामराव खत्री वय ४० वर्ष रा.रामपुरी कँम्प अमरावती |
| घटनास्थळ | रामलक्ष्मण संकुल,सिंधी चौक अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १६/०५/२०२० चे १४.०० वा. ते दि. १७/०५/२०२० चे ९.३० वा |
| दाखल ता. वेळ | दि. १७/०५/२०२० चे १५.०८ वा |
| आरोपी | नरेंन्द्र आत्राम |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | यातील हकीकत अशा प्रकारे आहे की,,नमुद घटना ता.ठिकाणी व वेळी यातील फिर्यादी यांचे धान्याचे दुकान आहे हे दि. १६/०५/२०२० ला दुकान उघडले असता धान्याची विक्री करुन २.२५ वा दुकान बंद केले.व घरी गेले असता समोरील शटर लावले होते विजय सुंदरानी व गजु नावाचा ईसम हे घरी सांगत आले की, तुमच्या दुकानाचे लॉक तोडलेले दिसत आहे,दुकानात पाहणी केली असता धान्याची पोती चोरी गेल्याचे दिसुन आले गहु अंदाजे १२० कट्टे, कि.अ.९०,००० रु. २) चावल चे ९ कट्टे कि.अ.१५००० रु. ३) तुरुची दाळ ६ कट्टे कि. १५००० रु. असा एकुण १,२०,००० रु.चा माल नरेंन्द्र आत्राम याने चोरुन नेला अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | पोउपनि. सत्यवान भुयारकर पोस्टे. गाडगेनगर अमरावती |

३.

| | |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | **गाडगे नगर, अमरावती शहर** |
| **अप क्र. व कलम** | **अप.न. ३९५/२०२० कलम ३२४, ५०४ भादवी** |
| **फिर्यादी** | **विशाल सुरेश बोरकर वय ३० वर्ष रा.विलास नगर गल्ली.न.१ बाबसाहेब पुतळयाजवळ अमरावती** |
| **घटनास्थळ** | **.विलास नगर गल्ली.न.१ बाबसाहेब पुतळयाजवळ अमरावती** |
| **घटना ता. वेळ** | **दि. १६/०५/२०२० चे २१.०० वा.** |
| **दाखल ता. वेळ** | **दि. १७/०५/२०२० चे १५.४० वा .** |
| **आरोपी** | **सुरज पाटनकर रा..विलास नगर गल्ली.न.१ बाबसाहेब पुतळयाजवळ अमरावती** |
| **गुन्ह्याची थोडक्यात हकिकत** | **यातील हकीकत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता.ठिकाणी व वेळी यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यातील राहत असुन फिर्यादी व आरोपी नामे सुरज सुनिल पाटणकर हे जुगार खेळत असता यातील आरोपी हा पैसे जिंकला वरुन फिर्यादी यांला शिवीगाळ केली व फिर्यादी व आरोपी मध्ये वाद झाला व आरोपी याने त्याचे घरी जावुन त्याने चाकु आणला व फिर्यादीच्या डाव्या साईडला पोटावर चाकु मारला व आरोपी हा तेथुन पळुन गेला व फिर्यादी याला त्याचे आईने ईर्विन दवाखाना येथे उपचार करणे करिता नेले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला** |
| **तपासी अधिकारी** | **पोउपनि. सत्यवान भुयारकर पोस्टे. गाडगेनगर अमरावती** |

४.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अप क्रमांक व कलम | ३६०/२०२० कलम ४६१, ३८० भा.द.वि. |
| फिर्यादी | महेंद्र गणेशराव आखरे वय २४ वर्ष रा. ग्राम अंजनगांव बारी ता.जि.अमरावती |
| घटनास्थळ | फिर्यादी यांचे शेत अंजनगांव बारी शेत सर्वे नं. ३४८/२ |
| घटना ता. वेळ | १६/०५/२०२० चे ०७:३० वाजता ते १०:०० वाजता |
| दाखल ता. वेळ | १७/०५/२०२० चे १३:०६ वाजता |
| आरोपी | अज्ञात |
| गुन्हयांची थोडक्यात हकीकत | अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा जेवन करणे करीता घरी गेला होता. रात्री १०:०० वाजता दरम्यान तो परत शेतात आला रात्री पाउस व वादळ आल्याने पोल्ट्री फॉर्म वर लक्ष दिला नाही व दुस—या दिवशी सकाळी ०८:०० वा चे दरम्यान कोंबळया फॉर्म मधुन बाहेर येतांना दिसल्या नतंर ते पाहण्या करीता गेला असता फॉर्म ची जाळी कापुन तोडलेली दिसली व त्यातील अंदाजे ५० गावराण कोंबळया किमंत प्रति नग ३०० प्रमाणे अंदाजे १५,०००/— रू कोणत्या तरी अज्ञात इसमांन चोरून गेल्याने सदर चा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि उमेश मारोडकर पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती शहर |

५.

| पोलीस स्टेशा | वलगांव |
|---|---|
| अप क्र. व कलम | ३४२/२०२० कलम १८८,२६९,२७१, भादवी , सहकलम ३,४ साथीचे रोग अधिनियम ,५१(ब) आपतत्‍ व्यवस्थापन अधिनियम |
| फिर्यादि | सरतर्फ पो.नि. आसाराम चोरमले पो स्टे वलगांव |
| आरोपी . | १)विजय डांगे वय ३८ वर्ष २)आनंद डांगे वय ४५ वर्ष ३)विजय डांगे यांचा चुलत भाउ ४)सोबत अनोळखी ३ इसम |
| घटनास्थळ | ग्राम नया अकोला |
| घटना.ता.वेळ | १७/०५/२०२० चे १३/१५ वाजता सुमारास |
| दाखल ता.वेळ | १७/०५/२०२० चे १४/५५ वाजता |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळि व ठाकानी यातील फिर्यादी व पोलीस स्टॉप असे १ मो क्रंM.H२७ AA-५८७ ने पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना कोराणा विषाणुचा प्रादुभाव सोखण्या करीता मा.जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचे क्रं.कक्ष२७/कवी-गृह विभाग/कवि-४४५/२०२०दि.०३/०५/२०२० अन्वये संपुर्ण अमरावती हद्दीतसंचार बंदी लागु करण्यात आली असता त्या अनुशंगाने पेट्रोलींग करीत असतांना ग्राम नया अकोला येथे यातील नमुद वरील आरोपी हे आयसर वाहन क्रं.M.H२७ BX ४४७४ चे मागील बाजुस दारु पित असतांना मिळुन आले व आम्हाला पाहताच पळुन गेले.अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि विनोद चव्हाण पो स्टे वलगांव |

६.

| पोलीस स्टेशन | राजापेठ |
|---|---|
| अप क्र. व कलम | अप क्र ३३५/२०२० कलम १८८,२६९ भादवि ,सह कलम साधीचा रोग अधिनीयम १८९७ मधील २,३,४ ,सह कलम ५१ ब राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा |
| फिर्यादि | सर तर्फे पोउपनी मुळे पोस्टे राजापेठ अमरावती शहर |
| घटनास्थळ | छत्री तलाव रोड पुलाजवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | १६/५/२०२० चे २३.४५ वा |
| दाखल ता. वेळ. | १७/५/२०२० चे ०१.५४ वा |
| आरोपी | १) संजय बाबुलाल अग्रवाल वय ५५ ,२. सुरज संजय अग्रवाल रा एकनाथपुरम अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठीकाणी मा.जिल्हाधिकारी सा.अमरावती शहर यांचे कोरोना विषाणु प्रादुर्भाव रोखण्यासाठी बंदचा आदेश जारी असतांना यातील दोन्ही आरोपीतांनी त्यांचे ताब्यातील वाहण क्र १. एमएच २७ बि झेड ६००२ हुंदाई व्हेन्यु व २.एमएच २७ बि एक्स ४३०८ मालवाहु गाडी चालवीतांना मिळुन आले तसेच त्यांचे कडे कोणतीही विशेष परवानगी मिहुन आली नाही वरुन जिल्हाधीकारी सा यांचे आदेश क्र २७/कली/गृह विभाग/१४४ आदेश कावी ४४५/२०२० दि,०५/०५/२०२० प्रमाणे आदेश निर्गमीत असतांना सुद्धा सदर इसमे यांनी आदेशाचे उल्लघन करतांना मिळुन आल्याने नमुद इसमाचे क्रुत्य हे कलम १८८ २६९ भादवी सह कलम २,३,४ साथीचे रोग प्रतिबंधक कायदा ५१(ब)राष्ट्रीय आपत्‍ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम २,३,४ साथ रोग प्रतीबंधक कायदा १८९७ प्रमाणे होत असल्यने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अमलदार | पोपनी मुळे |

७.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप क्र ३३६/२०२० कलम १८८,२६९ भादवि ,सह कलम साधीचा रोग अधिनीयम १८९७ मधील २,३,४ ,सह कलम ५१ ब राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा |
| फिर्यादि | सर तर्फे पोहेका रंगराव जाधव ब नं ९२१ पोस्टे राजापेठ अमरावती शहर |
| घटनास्थळ | नवनाथ किराणा हमालपुरा अमरावती |
| घटना ता. वेळ | १७/५/२०२० चे १०.४० वा |
| दाखल ता. वेळ. | १७/५/२०२० चे १३.०२ वा |
| आरोपी | १) नवनाथ वसंतराव कोल्हे वय ३५ रा हमालपुरा अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठीकाणी आरोपीवर प्राप्त गुप्त माहीतीच्या आधारे पंचासह जावुन पाहनी केली असता सदर आरोपीने जनता कर्फयु दरम्यान कुठललेही दुकान सुरु न ठेववण्याचे सक्त आदेश असतांना त्यांनी त्याचे नवनाथ किराणा नावाचे दुकान सुरु ठेवुन कोरोना रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने साधीचा रोग प्रतिबंधक अधिनीयम १८९७ व राष्ट्रीय आपती् व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मा.जिल्हाधिकारी सा.अमरावती शहर यांचे आदेश क्र २७/कली/गृह विभाग/१४४ आदेश कावी ४४५/२०२० दि,०५/०५/२०२० प्रमाणे संचारबंदीचा आदेश निर्गमीत असतांना सुद्धा सदर इसम हा आदेशाचे उल्लघन करतांना मिळुन आल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अमलदार | पोहेका रंगराव जाधव ब नं ९२१ |

८.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ४७२/२०२० कलम ४४८,३२४,५०४, ५०६ भादवी |
| फिर्यादि | एक महिला |
| घटनास्थळ | वडाळी पाण्याच्या टाकी जवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १७.०५.२०२०चे ०१.०० वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. १७.०५.२०२०चे ०३.१५ वा |
| आरोपी | अंकुश श्रीकृष्ण गवई वय २५ वर्ष, वडाळी अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ. ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी ही कुटुंबासह घरात झोपली असता नमुद आरोपी अकुश गवई याने फिर्यादीच्या घरात बेकायदेशिर रित्या घराच्या मागच्या दरवाज्याने प्रवेश केला त्यामुळे फिर्यादी व फिर्यादीचे पती, मुलीसह जाब विचारण्या करिता गेले असता फिर्यादीच्या पतीला नमुद आरोपीने लाकडी राप्टर ने मारुन जखमी केल्याने डोक्यातुन रक्त निघु लागले तसेच फिर्यादीची मुलगी हीला थापडा मारल्या व शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो.नि. कानपुरे `पो.स्टे ` फ्रेजरपुरा अमरावती शहर |

९.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ४७३/२०२० कलम ३२४,५०४ भादवी |
| फिर्यादि | एक महिला |
| घटनास्थळ | वडाळी पाण्याच्या टाकी जवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १७.०५.२०२०चे ०१.१५ वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. १७.०५.२०२०चे ०३.४७ वा |
| आरोपी | दिपक भिमराव हीवराळे वय ४० वर्ष, रा. वडाळी पाण्याच्या टाकी जवळ अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ. ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी ही मुलासह घरात झोपली असता फिर्यादीला घराचा दरवाजा ठोकल्याचा आवाज आला फिर्यादीने दरवाजा उघडला असता आरोपी नामे दिपक हिवराळे याने म्हटले कि, तुमचा मुलगा अंकुश हा आमचे घरात घुसला असे म्हणुन फिर्यादीच्या मुलाला घराबाहेर बोलाविले व शिवीगाळ करुन मारहान करण्यास सुरुवात केली व आरोपीने त्याचे घरातुन लाकडी काठी आणुन फिर्यादीच्या मुलगा अंकुश याचे डोक्यावर व हाता पायावर मारले तेव्हा अंकुश याच्या डोक्याला जखम होवुन रक्त निघु लागले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो.नि. कानपुरे पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

१०.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ४७४/२०२० कलम २९४,३५२ भादवी |
| फिर्यादि | एक महिला |
| घटनास्थळ | राहुल नगर आकाश किराणा दुकाना जवळ बिच्छु टेकडी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १७.०५.२०२०चे १०.३० वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. १७.०५.२०२०चे १३.५३ वा |
| आरोपी | सुनिल भिमराव गडलिंग वय २८ वर्ष, रा. राहुल नगर बिच्छु टेकडी अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद आरोपी हा फिर्यादीची बहीन हीचा पती असुन तिचे व आरोपीचे व्यवस्थित पटत नसल्याने तिने कोर्टात फारकती साठी अर्ज केला असुन ते दोघेही विभक्त राहतात परंतु हा फिर्यादी सोबत वारंवार वाद करित असतो यातील नमुद घ. ता. वेळी व ठीकानी फिर्यादी ही तीचा पती व आई सह घरी हजर असतांना नमुद आरोपी याने सुनिल भिमराव गडलिंग याने फिर्यादीचे घरा समोर गेटजवळ येवुन आरडा ओरड करु लागल्यामुळे फिर्यादीने घराच्या बाहेर जाउन तुम्ही कशासाठी आरडाओरड करत आहात असे म्हटले असता नमुद आरोपी याने अश्लिल शिवीगाळ करीत, आमच्या नवरा बायको मध्ये वाद घातले असे म्हणुन मारण्यासाठी धावुन आला व धक्का दिला फिर्यादीला अश्लिल भाषेत शिवीगाळ केली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पो. उप नि. मंठाळे पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |